Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

**(सर्व अभ्यासक्रमाच्या (विधी विद्याशाखा वगळून) विषम सत्राच्या परीक्षेस बसणा–या विद्यार्थ्यांच्यासाठी)**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी 2020 मधील सर्व अभ्यासक्रमासाठी **(विधी विद्याशाखा वगळून)** विषम सत्रासाठी विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या (अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून) पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांची (Repeater Students) परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार सर्व अभ्यासक्रमामधील ( अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून ) **(उदा. बी. ए. अभ्यासक्रम – सत्र 2 व 4 फ्रेश विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता निकाल जाहीर केला तथापी त्या विद्यार्थ्यांचे सत्र 1 किंवा 3 या एक किंवा त्यापेक्षा जादा विषय अनुत्तीर्ण होते. अशा विद्यार्थ्यांचें सत्र 1, 3, व 5 तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रम – सत्र 2, 4 व 6 फ्रेश विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता निकाल जाहीर केला तथापि त्या विद्यार्थ्यांचे सत्र 1, 3 किंवा 5 चा एक किंवा त्या पेक्षा जादा विषय अनुत्तीर्ण होते अशा विद्यार्थ्यांचे सत्र 1, 3, 5 व 7)** विषम सत्राच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या (Repeater Students) परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे करणेत येत आहे.

1. सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. 15 डिसेंबर, 2020 ते 31 डिसेंबर, 2020 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर सुयोग्य पध्दतीने होतील. (परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.)
2. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा अग्रणी अथवा समन्वयक म्हणून नियुक्त केलेल्या महाविद्यालयामार्फत होतील.
3. सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विषम सत्राच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर होईल. तसेच सदर परीक्षेसाठी कमाल प्रश्नांची मर्यादा ज्या त्या अभ्यास मंडळाने यापूर्वीच्या उन्हाळी अंतिम सत्राच्या परीक्षा पध्दतीनुसार असेल.
4. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप खालीलप्रमाणे असून प्रत्येक प्रश्नाच्या खाली/समोर उत्तरासाठी जागा ठेवण्यात येईल.

   उदा. – प्रश्न .................................................................................................... [योग्य पर्याय]

   A)-------------- B)--------------- C) -------------- D) --------------
5. उत्तरासाठी √ (टिकमार्क) न करता चौकटीमध्ये उत्तर लिहीण्यात यावे (उदा. A, B, C, D इत्यादी )
6. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येईल.
7. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेत येईल.
8. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना सोबत जोडलेल्या असून त्यानुसार योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३९३ 27 NOV 2020
दिनांक:– 27 नोव्हेंबर, 2020

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी